दाखल दिनांक :: २७/०३/२०१५
नोंदणी दिनांक :: २७/०३/२०१५
निकाल दिनांक :: २९/०१/२०१६
कालावधी :: वर्ष महिना दिवस
०० १० ०२

# प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दौंड, ता.दौंड, जि.पुणे यांचे न्यायालयात
(न्या. वि. फ. चौगुले यांचेसमक्ष)

नियमित फौजदारी खटला क्रं. ७८/२०१५
निशाणी क्रमांक : २५

महाराष्ट्र शासनातर्फे, )
पोलीस निरीक्षक, यवत पोलिस ठाणे )
(मुळ फिर्यादी : करुमनाशेरी सुब्रमण्यम गणेशन )
राहणार— फ्लॅट नं. ७० अ, पंजाब सोसायटी, )
अंधेरी (पुर्व), मुंबई. ) ........ सरकारपक्ष

— विरुद्ध —

मंगेश बबन वाघमारे )
वय :— ३० वर्षे, धंदा :— मजूरी )
राहणार—खोपाली प्रकाशनगर, गगनगिरी मंदिराच्या )
बाजुला, तालुका—खालापूर, जिल्हा— रायगड ) ...... आरोपी

आरोप : भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३७९ सह ३४ अन्वये

सरकार पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता :: सौ के. ए. बागल
आरोपीतर्फे विधिज्ञ :: सौ. के. बी. भोसले

## न्या य नि र्ण य

( *उद्घोषित दिनांक २९ जानेवारी, २०१६* )

**१.** फिर्यादी महाराष्ट्र सरकार यांनी आरोपींविरूध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३७९ सह ३४ प्रमाणे दोषारोप ठेवलेला आहे.

२. यातील फिर्याद पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे.

फिर्यादी करुमनाशेरी सुब्रमण्यम गणेशन हा दि. १४.०८.२०१४ रोजी सायंकाळी ०४.५० वाजता अंधेरी उपनगर मुंबई येथे हैद्राबाद कडे जाण्यासाठी ट्रॅव्हल्स क्रं. केए—०१/एए—५५४२ या बसमध्ये बसला. सदरची बस रात्री ११.३० च्या सुमारास बोरीपार्धी, ता.दौंड, जि.पुणे हद्दीतील लक्ष्मीनारायण ढाबा येथे जेवणासाठी थांबली. त्या ठिकाणी फिर्यादी आपल्यासोबतची साहित्याची बॅग बसमध्ये ठेवुन जेवणासाठी हॉटेलमध्ये गेलेला होता. सदर बॅगमध्ये लिनोवा कंपनीचा लॅपटॉप, पासपोर्ट, पॅनकार्ड, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड असे साहित्य होते. फिर्यादी जेवण करुन बसमध्ये आला असता त्या ठिकाणी त्याला आपली बॅग आढळली नाही. मात्र फिर्यादीला गावी जाणे गरजेचे असल्याने तो आपल्या गावी गेला व तेथे केपीएचबी या पोलिस ठाण्यामध्ये त्याने तक्रार नोंदविली.

३. दरम्यान फिर्यादीस यवत पोलिस ठाण्यातुन त्याची चोरीस गेलेली बॅग आरोपी सतिश वाघमारे, विलास बडे, मंगेश वाघमारे यांनी दुसरा गुन्हा क्रं. २४५/२०१४ मधील पोलिस कोठडीमध्ये असताना काढुन दिल्याबाबत माहिती मिळाली. त्यानुसार फिर्यादीने आपली तक्रार यवत पोलिस ठाण्यात दिलेली आहे. ती तक्रार गु.र.नं. ३५३/२०१४ नुसार दाखल करण्यात आली. तिचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक एस.एस.कांबळे यांच्याकडे देण्यात आला.

४. श्री. एस.एस.कांबळे यांनी आपल्या तपासामध्ये आरोपीकडून गु.र.नं. २४५/२०१४ मधील तपासात जप्त झालेल्या ऐवजाच्या पंचनाम्याची सत्यप्रत हस्तगत केली. घटनास्थळाचा पंचनामा केला. साक्षीदारांचे बयाण नोंदविले. तपासाअंती आरोपी सतिश भिमराव वाघमारे, विलास महादेव बडे व मंगेश बबन वाघमारे यांचेविरुध्द दोषारोप दाखल केलेला आहे. अज्ञात दोन आरोपी रवि व अवि यांचेविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ प्रमाणे पुर्तता बाकी ठेवलेली आहे.

५. आरोपी क्रं. ३ मंगेश बबन वाघमारे हा सदर गुन्हयामध्ये न्यायालयीन कोठडीत असल्याने व इतर आरोपींची विनाविलंब हजेरी मिळण्याची शक्यता नसल्याने

आरोपी क्रं. ३ चे वकिलांनी निशाणी २५ कडे खटला विभक्त करण्याचा अर्ज सादर केला. सदरचा अर्ज गुणदोषावरती मंजूर करण्यात आला.

**६.** आरोपी क्रं. ३ मंगेश बबन वाघमारे याचेविरुध्द मी निशाणी २६ कडे दोषारोप निश्चित केले आहे. सदरचे दोषारोप आरोपीस त्याचे बोलिभाषेमध्ये वाचुन व समजावून सांगण्यात आले व त्यानुसार आरोपीचे निवेदन निशाणी २७ कडे नोंदविण्यात आले. आरोपीने गुन्हा कबुल केलेला आहे.

**७.** आरोपीविरुध्द निश्चित केलेले दोषारोप खालीलप्रमाणे —

| <u>अ.क्रं.</u> | <u>दोषारोप</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १) | सदर आरोपी मंगेश बबन वाघमारे याने इतर फरार आरोपी सतीश भिमराव वाघमारे, विलास महादेव बडे तसेच रवि व अवि या दोन अज्ञात ईसमांशी संगनमत करुन दि. १४.०८.२०१४ रोजी रात्री ११.३० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी करुमनाशेरी सुब्रमण्यम गणेशन हा मुंबई ते हैद्राबाद ट्रॅव्हल्स क्रं. केए—०१/एए—५५४२ मधुन जात असताना बोरीपार्धी चौफुला हद्दीतील लक्ष्मीनारायण ढाब्याजवळ जेवणासाठी थांबले असता व फिर्यादी आपल्यासोबत असलेली बॅग ट्रॅव्हल्समध्ये ठेवुन जेवणास गेला असता सदरची बॅग व त्यातील मौल्यवान वस्तु लिनोवा कंपनीचा लॅपटॉप रु. १५,०००/— किंमतीचा, पासपोर्ट, पॅनकार्ड, दोन क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड व ओळखपत्र फिर्यादीचे संमतीशिवाय मुद्याम लबाडीच्या इरादयाने चोरुन नेले ? | ............ आरोपीने दोषारोप कबुल केला. |
| २) | काय आदेश ? | ....... अंतिम आदेशाप्रमाणे |

**८.** आरोपीने गुन्हा कबुल केला असल्याने मी त्याचे व त्याचे वकिलांचे तसेच सरकारी वकिलांचे शिक्षेच्या मुद्दयावर म्हणणे ऐकुन घेतले. आरोपीचे वकिल सौ. भोसले यांनी युक्तीवादात नमुद केले की, आरोपी हा साधारण १७ महिने ७ दिवस

न्यायालयीन कोठडीत आहे. सदर गुन्हयामध्ये चोरीस गेलेल्या मालाच्या मुल्याचा विचार करता आरोपीने यापुर्वीच भोगलेल्या न्यायालयीन कोठडीचा कालावधी शिक्षा म्हणुन जाहीर करावी व त्यास ताबडतोब मुक्त करावे. याउलट सरकारी वकिलांनी पोलिस यंत्रणेने गस्त घालत असताना आरोपीस पकडलेले आहे. त्यांच्याकडून सदर गुन्हयातील चोरीचा माल इतर गुन्हयाच्या तपासामध्ये मिळुन आलेला आहे. यावरुन ते सराईत गुन्हेगार आहेत असे दिसते. त्यामुळे त्यास भा.दं.वि कलम ३७९ सह ३४ प्रमाणे जास्तीत जास्त असलेली ३ वर्षाची कारागृहाची शिक्षा दंडासह जाहीर करावी अशी विनंती केली.

**९.** सदर आरोपी हा दि. २२.०८.२०१४ पासून आजतागायत सदर गुन्हयामध्ये न्यायालयीन कोठडीत आहे. आरोपी सराईत गुन्हेगार आहे अगर कसे ते शाबीत झाले नाही. त्याच्याविरुध्द यापुर्वीच अशाच प्रकारचा गुन्हा सिध्द झालेबाबत कोणताही पुरावा सरकारपक्षाने सादर केला नाही. सदर गुन्हयामध्ये एक लॅपटॉप साधारण १५,०००/— किंमतीची मुल्यवान वस्तु चोरीस गेलेली होती. ती फिर्यादीस मिळालेली आहे. सदरची बाब विचारात घेता आरोपीने यापुर्वीच भोगलेला न्यायालयीन कोठडीचा कालावधी शिक्षा म्हणुन जाहीर केल्यास न्यायाचा अंतीम हेतु साध्य झाला असे म्हणता येणार आहे. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी नामे मंगेश बबन वाघमारे यास भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३७९ सह ३४ प्रमाणे गुन्हयाकरिता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४१ प्रमाणे दोषी ठरविण्यात येत आहे.

२. आरोपीने दि. २२.०८.२०१४ पासून ते आज दि. २९.०१.२०१६ पर्यंत म्हणजे एकुण १७ महिने ७ दिवसाची न्यायालयीन कोठडी यापुर्वीच भोगलेली आहे तोच कालावधी शिक्षा म्हणुन जाहीर करण्यात येते.

३. आरोपीस फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४२८ चा लाभ मंजूर करण्यात येतो. आरोपीने शिक्षा कालावधी या आधीच भोगलेला असल्याने त्याची इतर गुन्हयात आवश्यकता नसल्यास तात्काळ मुक्त करण्यात यावे.

४. आरोपी क्रं. १ व २ करिता खटला प्रलंबित ठेवावा. त्यांच्याविरुध्द कायमस्वरुपी अजमानती वॉरंट काढण्यात यावे.

५. सदर न्यायनिर्णयाची प्रत आरोपीस विनामुल्य देण्यात यावी.

सही/— XXX
( विजय फ. चौगुले )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दौंड.
ता.—दौंड, जि.—पुणे

ठिकाण : दौंड
दिनांक : २९/०१/२०१६